<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक.१ यांची जबानी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - दत्तात्रय हणमंतराव कोळी

वय-५८ व्यवसाय – अन्न सुरक्षा अधिकारी सांगली

रा -अन्न व औषध प्रशासन सांगली

**<u>सरतपासणी सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती डी.बी.पाटील</u>**

१. मी जून २०१४ पासुन सांगली येथे अन्न सुरक्षा अधिकारी म्हणुन कार्यरत आहे. ८-२-२०१८ रोजी मी एल.सी.बी.चे पोलिस व स्वतंत्र साक्षीदार घेवुन हरी ओम एंटरप्रायजेस वासुंबे ता तासगाव येथे गेलो. त्यावेळी स्थानीक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलिस उपनिरीक्षक व त्यांचा स्टाफ हजर होते. त्याठिकाणी प्रतिबंधीत अन्न पदार्थाची विक्री होते अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाली होती. त्याठिकाणी गेल्यानंतर २ व्यक्ती हजर होत्या. त्यांना आमची ओळख करुन देवुन तपासणीची माहिती सांगीतली. तपासणी केल्यानंतर त्याठिकाणी ५ प्रतिबंधीत अन्न पदार्थ मिळाले. त्यामध्ये गोवा १००० जर्दा, रत्ना ३००० सुगंधी तंबाकु, विमल पानमसाला, एस.१ सुगंधी तंबाकु, स्टार पानमसाला यांचा साठा मोठया बॅगमध्ये केलेला आढळुन आला. त्याठिकाणी तपासणी अहवाल बनविला. आता मला दाखविलेला तपासणी अहवाल तोच आहे. त्यावर माझी, साक्षीदार सौरभ धनाजी जाधव, विक्रेता पंकज सतीश सोनी व कॉन्स्टेबल एस आर पाटील यांची स्वाक्षरी आहे. विक्रेत्याची स्वाक्षरी हजर व्यक्ती म्हणुन व त्याच्या ताब्यात साठा सापडला म्हणुन घेतली. अहवालातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला निशाणी पी१/पीडब्लु१ दिली.

२. त्यातील सर्व्हीलियन्स नमुने म्हणजे प्रत्येक अन्न पदार्थाचे एक-एक पाकीट घेतले. उर्वरित शिल्लक साठा जप्त केला. त्याची एकत्रित किंमत ६२,५००/- रुपये आहे. त्यानंतर मेमोरँडम पंचनामा तयार केला. आता दाखविलेला पंचनामा तोच आहे. त्या पंचनामेसोबत घेतलेल्या सर्व्हीलियन्य नमुन्याचे लेबल डिस्क्रीपशन लिहलेला कागद जोडलेला आहे. त्यावर माझी, साक्षीदार सौरभ धनाजी जाधव, विक्रेता पंकज सतीश सोनी व कॉन्स्टेबल एस आर पाटील यांची स्वाक्षरी आहे. त्याला निशाणी क्र.पी२/पीडब्लु१ दिली. त्यानंतर ते नमुने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा कोल्हापुर येथे तपासणीसाठी पोस्टाद्वारे पाठविले. त्याची स्थळप्रत दाखल केली आहे. आता दाखविलेली स्थळप्रत

तीच असुन त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला निशाणी क्र.पी३/पीडब्लु१ दिली.

३. जप्त केलेला उर्वरित साठा, पदावधित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन सांगली यांच्या ताब्यात दिला. त्यासाठी मी प्रमुख लिपीक यांच्याकडील नोंदवहीत नोंद घेतली.

४. त्यानंतर मी अन्न पदार्थांच्या उत्पादकांना पत्र पाठविले. उत्पादकांची माहिती ही घेतलेल्या नमुन्यावरील लेबल डिस्क्रीपशन वरुन मिळाली होती. दि.१७-३-२०१८ रोजी मी प्रभात जर्दा फॅक्टरी नोएडा यांना पाठविलेल्या पत्राची स्थळप्रत दाखल केली आहे. आता दाखविलेली प्रत तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला निशाणी क्र.पी४/पीडब्लु१ दिली. दि.१७-३-२०१८ रोजी मी विष्णु ॲरोमा पाउचींग प्रा.लि. मोरेया अहमदाबाद यांना पाठविलेल्या पत्राची स्थळप्रत दाखल केली आहे. आता दाखविलेली प्रत तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला निशाणी क्र.पी५/पीडब्लु१ दिली. दि.१७-३-२०१८ रोजी मी गेलुवू फुड प्रॉडक्टस नेलमंगला बंगळुरु यांना पाठविलेल्या पत्राची स्थळप्रत दाखल केली आहे. आता दाखविलेली प्रत तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला निशाणी क्र.पी६/पीडब्लु१ दिली. दि.१७-३-२०१८ रोजी मी घोडावत इंडस्ट्रीज (इंडिया) प्रा.लि. अदोरगुंची धारवाड यांना पाठविलेल्या पत्राची स्थळप्रत दाखल केली आहे. आता दाखविलेली प्रत तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला निशाणी क्र.पी७/पीडब्लु१ दिली. दि.१७-३-२०१८ रोजी मी घोडावत फुड्स इंटरनॅशनल प्रा.लि. अदोरगुंची धारवाड यांना पाठविलेल्या पत्राची स्थळप्रत दाखल केली आहे. आता दाखविलेली प्रत तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्याला निशाणी क्र.पी८/पीडब्लु१ दिली. ते पत्र त्या उत्पादकांना उत्पादनाची विक्री केली आहे किंवा नाही याची माहिती मिळणेसाठी पाठविले होते. ती पत्रे रजिस्टर पोस्टाने पाठविली होती. त्याच्या प्राप्त झालेल्या पावत्या दाखल केल्या आहेत. त्यांना निशाणी क्र.पी९,पी१०,पी११/पीडब्लु१ दिल्या. सर्व उत्पादकांनी त्यांनी महाराष्ट्रात त्या अन्न पदार्थांची विक्री केली नाही असे उत्तर पाठविले. त्या उत्तारांच्या मुळ प्रती मी दाखल केल्या आहेत. त्यांना ओळखीसाठी निशाणी पी१२,पी१३,पी१४,पी१५,पी१६/पीडब्लु१ दिल्या.

५. त्यानंतर सर्व नमुन्यांचा एकत्रित अहवाल जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा कोल्हापुर यांचा अहवाल मला २०-३-२०१८ रोजी मिळाला. तो अहवाल मला माझे कार्यालयाकडुन मिळाला. अहवाल माझे कार्यालयात पोस्टाने आला होता. त्या अहवालाप्रमाणे तपासलेले नमुने हे प्रतिबंधित

अन्न पदार्थाचे असुन मानवी आरोग्यास धोकादायक आहेत असे कळविण्यात आले. तो मुळ अहवाल मी दाखल केला आहे. **( या अहवालास निशाणी देण्याची मागणी करण्यात आली परंतु फौ.व्य.सं.क.२९३ नुसार अहवाल देणारा अधिकारी हा नोटीफाईड अधिकारी दिसुन येत नाही, सबब प्रस्तुतचा अहवाल फौ.व्य.सं.२९३ प्रमाणे शाबीत होता किंवा नाही याचा मुद्दा अंतिम युक्तीवादासाठी राखुन ठेवण्यात येतो.)**

६. त्यानंतर मी अभियोग चालविण्याची संमती मिळविण्यासाठी संपुर्ण प्रस्ताव पदावधीत अधिका-याकडे सादर केला. आता दाखविलेला प्रस्ताव तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. प्रस्तावाला निशाणी क्र.पी१७/पीडब्लु१ दिली. तो प्रस्ताव पदावधीत अधिकारी यांनी आयुक्त अन्न व औषध प्रशासन मुंबई यांचेकडे पाठविल्याबाबतची प्रत मला दिली. आता दाखविलेली प्रत तीच आहे. त्यावर पदावधीत अधिकारी एस.बी.कोडगीरे यांचे स्वाक्षरी आहे ती मी ओळखतो. त्याला निशाणी क्र.पी१८/पीडब्लु१ दिली. त्यानंतर खटला दाखल करण्याचे आदेश सहा.आयुक्त एस.ए.चौगुले यांचे मार्फत मिळाले. आता दाखविलेले ज्ञापन तेच असुन त्यावर पदावधीत अधिकारी एस.ए.चौगुले यांची स्वाक्षरी आहे. ती मी ओळखतो. ज्ञापनाला निशाणी क्र.पी.१९/पीडब्लु१ दिली. त्या ज्ञापनासोबत मुळ संमती आदेश प्राप्त झाला होता तो मी दाखल केला आहे. त्याला निशाणी क्र.पी२०/पीडब्लु१ दिली. मंजुरी आदेश मिळालेनंतर मी न्यायालयात फिर्याद दाखल केली. आरोपीला दाखविल्यास ओळखु शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एस.बी.जाधव वकील**

दोषारोप नोंद होईपर्यंत उलटतपास राखुन ठेवण्यात आला.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

सही/-

सांगली. ( पी.पी.केस्तीकर )

दिनांक २०/०६/२०२३. मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली.